# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२६

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०९ जुलै, २०२६ / आषाढ १८, १९४८ (शके)**

**(१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री**
**(२) उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री**
**(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री**
**(४) शालेय शिक्षण मंत्री**
**(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**
**(६) पणन, राजशिष्टाचार मंत्री**
**(७) वस्त्रोद्योग मंत्री**
**(८) सहकार मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १४**

---

### राज्यात शेतकऱ्यांच्या कांदा पिकाच्या दरामध्ये घसरण झाल्याबाबत

**(१) * ९०९८ श्री.विक्रम काळे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके, श्री.हेमंत पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः नाशिक, पुणे, अहिल्यानगर, जळगाव व सोलापूर जिल्ह्यांसह विविध कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये कांद्याची निर्यात घटणे, देशांतर्गत मागणी कमी होणे व जागतिक परिस्थितीमुळे बाजारात अस्थिरता निर्माण होणे यामुळे कांद्याच्या दरामध्ये मोठी घसरण झाली असून उन्हाळी कांद्याचे प्रति क्विंटल रुपये २०० ते १,३०० पर्यंत दर खाली आल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चापेक्षा कमी दरात कांदा विकावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांद्याचा उत्पादन खर्च प्रति क्विंटल रुपये १,५०० ते १,८०० इतका असताना बाजारामध्ये शेतकऱ्यांच्या कांद्याला केवळ रुपये ५०, १५०, २००, ३०० ते ९०० प्रति क्विंटल इतका अत्यल्प बाजारभाव मिळत असल्यामुळे अनेक कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत आले असून आखाती देशांतील परिस्थितीमुळे निर्यातीत मोठी घट होऊन निर्यात कंटेनरची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात माहे एप्रिल मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे आधीच आर्थिक अडचणीत आलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनामार्फत कांद्याला योग्य हमीभाव जाहीर करणे, तसेच भावांतर योजना लागू करून प्रति क्विंटल १५०० रुपये अनुदान देण्याबाबत व कांदा दर स्थिरीकरणासाठी पूर्वी स्थापन करण्यात आलेल्या विविध समित्या, पवार समिती व पाशा पटेल समिती यांच्या शिफारशींची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची आवश्यकता असून, बाजार हस्तक्षेप योजना लागू करण्यास विलंब झाल्याने शेतकऱ्यांना माल कवडीमोल दराने विक्री करावी लागत आहे तसेच माहे जून, २०२५ मध्ये गठीत 'पाशा पटेल समिती'चा अहवाल प्रलंबित असताना नव्याने सचिवस्तरीय समिती गठीत करण्यात आली असून उक्त समितीस कालमर्यादा देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कांदा दरातील घसरण रोखण्याबाबत, निर्यातीतील अडथळे दूर करून बाजार हस्तक्षेप योजना लागू करण्यासाठी तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या कांद्याला हमीभाव, वाहतूक अनुदान, साठवणूक सुविधा व दीर्घकालीन स्थिर निर्यात धोरण उपलब्ध करून देण्याबाबत तसेच दिनांक २२ एप्रिल, २०२६ रोजी गठीत केलेल्या समितीमार्फत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.

मागील सहा महिन्यांची नाशिक, पुणे, अहिल्यानगर, जळगाव व सोलापूर या कांदा उत्पादक जिल्हयांतील बाजार समित्यांमध्ये कांद्याची आवक पहाता कांद्याच्या दरात घसरण झाल्याचे दिसून आले आहे. तथापि, मे महिन्यापासून सरासरी दरात वाढ झाली आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

माहे फेब्रुवारी, २०२६ च्या शेवटी आखाती देशांतील युध्दजन्य परिस्थितीमुळे भारतीय कांदा निर्यातीवर परिणाम झालेला आहे. प्रामुख्याने समुद्री वाहतूक खर्च वाढल्याने आखाती देशांसाठी प्रति कंटेनर भाडे ५५० ते ८०० डॉलर दरम्यान होते, मात्र युध्दाच्या पार्श्वभूमीवर शिपिंग कंपन्यांनी वॉर रिस्क सरचार्ज लागू केल्याने भाडे सात हजार डॉलरवर पोहोचले होते. त्यामुळे आखाती देशांतील भारताच्या निर्यातीत मोठी घट झाली.

तथापि, पश्चिम आशियातील संघर्षामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे कृषीमाल निर्यातीमधील सद्य:स्थिती निदर्शनास आणून देऊन सदर पार्श्वभूमीवर परिस्थिती Force Majeure म्हणून घोषित करण्याची तसेच बंदरावरील टर्मिनल प्लग-इन शुल्क, डेमरेज व इतर शुल्क माफ करण्याबाबत संबंधित प्राधिकरणांना निर्देश देण्याची विनंती करण्यात आली होती.
(३) व (४) कांद्याच्या दरात होणाऱ्या घसरणीवर उपाययोजना करण्यासंबंधी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी कांदा आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार कांद्यासंदर्भात तातडीच्या व दिर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २३ एप्रिल, २०२६ अन्वये मंत्रालयीन सचिव स्तरावर समिती गठित करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ०९ जून, २०२६ अन्वये सचिव समितीअंतर्गत कांदा क्षेत्रात तज्ञ असलेल्या व्यक्तींची उप समिती गठित करण्यात आली आहे.

तसेच राज्यातील शेतकऱ्यांचे हित विचारात घेऊन कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात प्रत्यक्ष शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी करणे, कांदा निर्यातदार शेतकऱ्यांना रोडटेप RoDTEP (Remission of Duties and Taxes on Export Products Scheme) योजनेंतर्गत देण्यात येणारे अनुदान १.९ टक्क्यांवरुन ४ टक्यांपर्यंत वाढविणे, कांदा खरेदी केंद्रावर कांदा ग्रेडिंग व सॉर्टिंग मशीन बसविणे, कांदा खरेदीचा दर ठरविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या किमान खात्रीशीर खरेदी दर (MAPP) चे सुत्र सुधारणे अशा विविध मागण्यांसंदर्भात मा.मुख्यमंत्री यांच्या स्तरावरुन दिनांक २५ मे, २०२६ रोजीच्या पत्रान्वये केंद्रशासनास विनंती करण्यात आली आहे. त्यानुषंगाने, मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय शिष्ठमंडळाची दिनांक २७ मे,२०२६ रोजी दिल्ली येथे कांदा दर घसरणी विषयी विविध मागण्यांसंदर्भात केंद्रीय सहकार व गृह मंत्री यांच्यासमवेत बैठक आयोजित करण्यात आली होती.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत

**(२) * ९६२६ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वात कमी साक्षरता दर असलेल्या नंदुरबार जिल्ह्यामध्ये ‘उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रम’ अंतर्गत घेण्यात येणारी पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी पुरेशा परीक्षार्थींची नोंदणी न झाल्यामुळे रद्द करण्यात आल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील एक लाख निरक्षरांनी सदर परीक्षा दिली असताना, नंदुरबार व नवापूरसारख्या आदिवासी व दुर्गम तालुक्यांमध्ये वेळेत नोंदणी प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे अनेक पात्र लाभार्थी परीक्षेपासून वंचित राहिले असून त्यास स्थानिक प्रशासनाची उदासीनता कारणीभूत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र पुरस्कृत ‘उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रम’ प्रभावीपणे राबविण्यात जिल्हा व गटशिक्षण अधिकारी स्तरावर झालेल्या दिरंगाईमुळे साक्षरता प्रसाराच्या उद्दिष्टांवर प्रतिकूल परिणाम होत असून शासकीय निधी व उपक्रमाचा मूळ हेतू प्रभावीपणे साध्य होत नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने भविष्यात दुर्गम व आदिवासी भागांमध्ये निरक्षरांची अचूक नोंदणी होण्यासाठी, जनजागृती वाढविण्यासाठी, नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी व साक्षरता अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: हे खरे आहे.

उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत सप्टेंबर, २०२५ मध्ये नंदुरबार जिल्ह्याला एकूण १६९८४ एवढे साक्षरता उद्दिष्ट्ये देण्यात आले होते व यानुसार जिल्ह्यात एकूण १९८१९ असाक्षर व्यक्तिंची नोंदणी करण्यात आली असून या व्यक्तिंची मुल्यमापन चाचणी घेण्यात आली होती. त्यात एकूण १९८१० व्यक्तींना नव साक्षर घोषीत करण्यात आले होते.

नंदुरबार जिल्ह्याचे साक्षरता उद्दिष्ट्ये पूर्ण झाल्याने मार्च, २०२६ मध्ये नंदुरबार जिल्ह्यात फक्त २५३१ ऐवढेच असाक्षर नोंदणी झालेली होती व उर्वरीत असाक्षर हे ऊसतोडणी व इतर रोजगारासाठी इतरत्र स्थलांतरीत झाल्याने मार्च, २०२६ साठी योजण्यात आलेली साक्षरता व मुल्यमापन परीक्षा रद्द करण्यात आली होती.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) उल्हास नवभारत साक्षरता अभियानाची अंमलबजावणी राज्यस्तरावर नियमीतपणे करण्यात येत असते. या योजनेंतर्गत केंद्रशासनामार्फत राज्य शासनाला दरवर्षी देण्यात आलेले निरक्षरांचे उद्दिष्टये नियमीतपणे पूर्ण करण्यात आले आहे. नंदुरबार जिल्ह्याने सन २०२५-२६ मध्ये दिलेले उद्दिष्ट ११७% साध्य केले असल्याने चौकशीची आवश्यकता नाही. नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी व दुर्गम भागातील असाक्षर लाभार्थ्यांची अचूक नोंदणी होण्यासाठी, साक्षरता विषयक जनजागृती वाढविण्यासाठी तसेच कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी शासनामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांमधील नियुक्त शिक्षकांच्या वेतनास विलंब होत असल्याबाबत

**(३) * ९१७९ श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांना त्यांच्या अध्यापन पदांवरील रिक्त जागांवर दिनांक १३ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार नियुक्ती करण्याचे अधिकार असून, मुंबईतील अनेक अल्पसंख्यांक संस्थांकडून सादर करण्यात आलेले शिक्षक नियुक्ती मान्यतेचे प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाकडे अनेक महिने प्रलंबित ठेवण्यात येत असून, संबंधित शिक्षकांना नियुक्ती मान्यता, शालार्थ आयडी, पदनिर्मिती मंजुरी, वेतन मंजुरी व प्रत्यक्ष वेतन मिळण्यासाठी बराच कालावधी लागत असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पसंख्यांक संस्थांमधील अनेक शिक्षकांनी नियमितपणे अध्यापन कार्य सुरू करूनही त्यांना शालार्थ आयडी मंजूर न झाल्यामुळे अनेक महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही तसेच पोर्टलद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांनाही शालार्थ आयडी, वेतन मंजुरी, सेवा नोंद पडताळणी व निधी वितरण प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात विलंब होत असल्यामुळे संबंधित शिक्षकांना आर्थिक, मानसिक व कौटुंबिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने अल्पसंख्यांक संस्थांमधील नियुक्त शिक्षक तसेच पोर्टलद्वारे नियुक्त शिक्षकांचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर निश्चित कालमर्यादेत, विशेषतः एका महिन्याच्या आत नियुक्ती मान्यता, शालार्थ आयडी, पदनिर्मिती मंजुरी व वेतन वितरण प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी स्वतंत्र कालबध्द कार्यपध्दती लागू करणे, ऑनलाईन प्रणाली अधिक सक्षम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच प्रकरणनिहाय जबाबदारी निश्चित करून विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) शासन निर्णय दिनांक १३ जुलै, २०१६ अन्वये अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना कर्मचारी नियुक्तीचे अधिकार आहेत. शासन निर्णय दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१२ व शासन निर्णय दिनांक १० जून, २०२२ मधील कार्यपध्दतीनुसार सदरहू नियुक्त कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता व तद्नुषंगिक बाबींच्या अनुषंगाने शिक्षण निरीक्षक यांचेकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येते. सद्य:स्थितीत शिक्षण निरीक्षक यांच्या स्तरावर वैयक्तिक मान्यता प्रस्ताव प्रलंबित नाहीत.
(२) व (३) शासन निर्णय दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१२ मधील वैयक्तिक मान्यता प्रदान करण्याबाबतच्या कार्यवाहीबाबत शासन निर्णय दिनांक १० जून, २०२२ अन्वये कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. तसेच, शासन निर्णय दिनांक १२ जून, २०२६ अन्वये शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्याच्या कार्यपध्दतीत कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हा परिषदेमधील गटशिक्षणाधिकारी व इतर तीन जणांना लाच घेताना अटक केल्याबाबत

**(४) * ८९९५ श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय शिक्षण विभागातील भ्रष्टाचाराच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी व सेवाविषयक प्रस्तावांची पारदर्शकता वाढविण्यासाठी ई-ऑफिस प्रणाली व डिजिटल प्रक्रिया कार्यान्वित करण्यात आली असतानाही नाशिक जिल्हा परिषदेमधील गटशिक्षणाधिकारी व अन्य तीन जणांना लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केल्याची घटना माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणामुळे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या प्रशासकीय कामकाजावर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक प्रस्तावांच्या कामकाजावर प्रतिकूल परिणाम झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून सर्वसामान्य नागरिकांना दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक व प्रशासकीय सेवांमध्येही अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांविरोधात यापूर्वीही भ्रष्टाचार, आर्थिक गैरव्यवहार अथवा पदाचा गैरवापर व सेवाविषयक प्रस्तावांच्या कामकाजात अनियमितता केल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या असून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने यापूर्वीही शिक्षण विभागासह इतर शासकीय विभागांमधील भ्रष्टाचार, लाचखोरी व आर्थिक गैरव्यवहार इ. प्रकरणांमध्ये अशा प्रकारच्या कारवाया केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नाशिक जिल्हा परिषदेमधील गटशिक्षणाधिकारी व अन्य तीन आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.

(४) याप्रकरणी दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने श्री.भाऊसाहेब तुकाराम चव्हाण, गट शिक्षणाधिकारी, पं.स. दिंडोरी यांना शासन आदेश दिनांक २०/०५/२०२६ अन्वये अटकेच्या दिनांकापासून निलंबित करण्यात आलेले आहे.

तसेच, श्री.देवीदास पाटील, कनिष्ठ लेखाधिकारी, शिक्षण विभाग (प्राथमिक), जि.प. नाशिक व श्री.निलेश भारती, प्राथमिक शिक्षक, पं.स. दिंडोरी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नाशिक यांनी अनुक्रमे दिनांक २३/०४/२०२६ व दिनांक २४/०४/२०२६ च्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील 'स्टेप' उपक्रमांतर्गत अनियमितता झाल्याबाबत

**(५) * ९७३६ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १३२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये राबविण्यात येत असलेल्या अल्पमुदतीच्या 'स्टेप' (स्किल ट्रेनिंग एन्हान्समेंट प्रोग्राम) अभ्यासक्रमांतर्गत संस्थाबाह्य उमेदवारांची नोंदणी करणे अनिवार्य असताना, अनेक संस्थांमध्ये केवळ उद्दिष्टपूर्तीसाठी 'डमी' उमेदवारांचा (संस्थेतील नियमित शिकाऊ उमेदवारांचा) भरणा करण्यात आल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात 'स्टेप' उपक्रमांतर्गत प्रशिक्षण, यंत्रसामग्री व फर्निचर खरेदीकरीता शासनाकडून २ कोटी ४० लाख २४ हजार रुपयांच्या निधीस प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, 'स्टेप' उपक्रमासाठी निधीची उपलब्धता असताना नियमित प्रशिक्षणाकरीता संस्थांमध्ये आवश्यक असणाऱ्या कच्च्या मालाच्या खरेदीसाठी निधी अपुरा असल्याने विद्यार्थ्यांच्या नियमित प्रशिक्षणावर प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, 'स्टेप' उपक्रमातील अनियमिततेची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच नियमित प्रशिक्षणाकरीता संस्थांमधील आवश्यक असणाऱ्या कच्च्या मालाच्या खरेदीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.

शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनांतर्गत प्रशिक्षण घेत असलेल्या सर्व प्रशिक्षणार्थ्यांना त्यांची रोजगार व स्वंयरोजगार क्षमता वृध्दींगत होण्यासाठी अल्प कालावधीचे अभ्यासक्रम घेण्याचे आवाहन प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली यांनी त्यांच्या दिनांक १/०९/२०२२ च्या पत्रान्वये केले आहे.

त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्य कौशल्य शिक्षण व प्रशिक्षण मंडळाने सादर केलेल्या प्रस्तावास अनुलक्षून, राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तांत्रिक विद्यालयांमध्ये अल्प कालावधीचे अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाने दिनांक १७/०९/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील नियमित प्रशिक्षणार्थ्यांनी अल्पकालीन अभ्यासक्रम पूर्ण केल्यास त्यांच्या कौशल्यात वाढ होऊन, त्यांच्या रोजगार व स्वंयरोजगाराच्या संधीमध्ये वाढ होणार आहे.

(२) हे खरे आहे.

(३) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील नियमित शिल्प कारागिर प्रशिक्षणाकरीता सन २०२५-२६ या वित्तिय वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुदींमधून रुपये १६.२२ कोटी एवढा निधी खर्च झाला आहे.

अल्पकालीन अभ्यासक्रमासाठी सन २०२६-२७ करीता दक्ष प्रकल्पांतर्गत शिक्षक/समन्वयकांचे मानधन, कच्चामाल व कौशल्य चाचणी संबंधी खर्चासाठी रुपये १८.९९ कोटी एवढी रक्कम खर्च करण्यास दिनांक ८/०५/०२६ च्या शासन ज्ञापनान्वये प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिली आहे.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांच्या नियमित दीर्घकालीन प्रशिक्षणासाठी कच्चा मालाकरीता पुरेशी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील नियमित प्रशिक्षणावर कोणताही प्रतिकुल परिणाम दिसून आलेला नाही. तसेच सदरहू अल्पकालीन अभ्यासक्रम न्यू एज कोर्सेसही सुरु करण्यात आलेले आहेत. जसे की, ई.व्ही., सोलार, ड्रोन इत्यादी तसेच महिलांसाठी विशेष बॅचेस यामूळे प्रशिक्षणर्थ्यांच्या रोजगारांच्या संधीमध्ये वाढ होणार आहे.

(४) उपरोक्त नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्यात येत असल्यामूळे यासंदर्भात कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

सन २०२६-२७ या वित्तिय वर्षात औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील नियमित प्रशिक्षणाच्या कच्च्या मालासाठी रुपये १९.९७ कोटी इतकी अर्थसंकल्पीत तरतूद करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील २९ साखर कारखान्यांकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांची कोट्यवधी रुपयांची एफ.आर.पी. थकीत असल्याबाबत

**(६) * १०१८६ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २९ साखर कारखान्यांकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांची सुमारे १,००० कोटी रुपयांहून अधिक एफ.आर.पी रक्कम थकीत असल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२५-२६ च्या गाळप हंगामातील तसेच त्यापूर्वीच्या हंगामांतील थकीत एफ.आर.पी. देयकांबाबत साखर आयुक्तालयामार्फत नियमित आढावा घेण्यात येत असून, संबंधित साखर कारखान्यांना नियमानुसार एफ.आर.पी.ची रक्कम अदा करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२५-२६ च्या गाळप हंगामातील तसेच त्यापूर्वीच्या हंगामातील थकीत एफ.आर.पी. रक्कम संबंधित शेतकऱ्यांना तातडीने मिळावी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच एफ.आर.पी.ची रक्कम विहित मुदतीत अदा न करणाऱ्या साखर कारखान्यांविरुध्द साखर आयुक्तालयामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) हे खरे आहे.

सन २०२५-२६ मध्ये गाळप घेतलेल्या २१० साखर कारखान्यांपैकी २९ साखर कारखान्यांकडे दिनांक ३१/०३/२०२६ अखेरच्या एफ.आर.पी. पंधरवडा अहवालाप्रमाणे ऊस उत्पादक शेतकऱ्यांची रुपये १,०१२.४५ कोटी एफ.आर.पी. थकीत होती.

दिनांक १५/०६/२०२६ अखेरच्या एफ.आर.पी.पंधरवडा अहवालाप्रमाणे उक्त नमूद २९ साखर कारखान्याकडे अद्याप रुपये ६१.९२ कोटी एफ.आर.पी. थकीत आहे.

(२) अंशत: खरे आहे.

साखर आयुक्तालयाच्या सांख्यिकी शाखेमार्फत दर १५ दिवसांनी कारखानानिहाय एफआरपी अदायगीबाबत माहिती संकलीत करून ती प्रसिध्द केली जाते.

गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये सद्य:स्थितीत एकूण ८१ साखर कारखान्यांना एफआरपी थकबाकीपोटी अदायगीबाबत सुनावणी नोटीसा बजाविल्या असून थकीत एफआरपी तात्काळ अदा करण्याबाबत संबंधित साखर कारखान्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) ज्या साखर कारखान्यांवर ऊस पुरवठादार शेतकऱ्यांची एफआरपी थकीत केल्यामुळे आरआरसीची कारवाई झाली आहे, तो साखर कारखाना ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांमार्फत साखर कारखान्याकडील गाळप ऊसाचे थकीत FRP रक्कम, तसेच कलम ३(३ए) नुसार सदरच्या थकीत रक्कमेवर १५ % वार्षिक दराने देय होणारे व्याज या रकमा सदरच्या साखर कारखान्याकडून जमीन महसुलाची थकबाकी समजून वसूल करण्यात येते.

कारखान्याने उत्पादीत केलेली साखर, मोलॅसिस आणि बगॅस इ. उत्पादनाची विक्री करून त्यामधुन एफ.आर.पी. ची थकीत रक्कम वसूल करून ऊस पुरवठादारांना अदा करण्यासाठी, तसेच सदरच्या साखर कारखान्याचा साखर साठा बँकेकडे तारण असल्यास तारण नसलेली कारखान्याची जंगम व स्थावर मालमत्ता जप्त करून सदर मालमत्तेवर दस्तऐवजामध्ये शासनाच्या नावाची नोंद घेण्याबाबत व सदर मालमत्तेची जप्ती करून त्याची विहित पध्दतीने विक्री करणेबाबत ऊस (नियंत्रण) आदेश,१९६६चे कलम ३(९) नुसार कारवाई करणेस संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये आज अखेर १० साखर कारखान्यांवर थकीत एफ.आर.पी. रुपये २५५.१८ कोटी रकमेची आरआरसी कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक १५/०६/२०२६ अखेरच्या एफ.आर.पी. पंधरवडा अहवालाप्रमाणे गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये गाळप हंगाम घेतलेल्या एकूण २१० साखर कारखान्यापैकी एकूण १५४ साखर कारखान्यांनी एफ.आर.पी.ची संपूर्ण रक्कम अदा केलेली आहे. उर्वरित एकूण ५६ साखर कारखान्यांकडे रुपये ३९६ कोटी एफ.आर.पी.अदा करणे बाकी आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विद्यापीठांची संलग्नता असतानाही अपुरी सुविधा व विद्यार्थीसंख्या असलेल्या बोगस महाविद्यालयांबाबत

**(७) * १०२४२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये विविध विद्यापीठांशी संलग्न असलेली काही महाविद्यालये आवश्यक भौतिक सुविधा, पात्र अध्यापकवर्ग, प्रयोगशाळा, ग्रंथालय तसेच किमान विद्यार्थीसंख्या यांसारख्या अनिवार्य निकषांची पूर्तता न करता केवळ कागदोपत्री अस्तित्वात असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत तीन शैक्षणिक वर्षांत अशा प्रकारच्या निकषांचे पालन न करणारी अथवा केवळ कागदोपत्री अस्तित्वात असलेली बोगस स्वरूपात आढळून आलेली किती महाविद्यालये शासन किंवा विद्यापीठे व संबंधित नियामक संस्थांच्या निदर्शनास आली आहेत आणि त्यांची विभागनिहाय माहिती काय आहे,

(३) असल्यास, विद्यापीठांकडून संलग्नता प्रदान करताना अथवा तिचे नुतनीकरण करताना निर्धारित निकषांचे पालन होत असल्याची खातरजमा करण्यासाठी कोणती यंत्रणा कार्यरत आहे तसेच निकषांचे उल्लंघन करणाऱ्या बोगस महाविद्यालयांवर कारवाई करण्याबाबत शासनाकडून संबंधित विद्यापीठांना कोणते निर्देश देण्यात आले आहेत,

(४) असल्यास, गत तीन वर्षांत अशा किती महाविद्यालयांची संलग्नता रद्द/स्थगित करण्यात आली आहे तसेच किती प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

राज्यातील काही विद्यापीठांशी संलग्नित काही महाविद्यालयांमध्ये आवश्यक भौतिक सुविधा, पात्र अध्यापकवर्ग, प्रयोगशाळा/ग्रंथालय व्यवस्था व किमान विद्यार्थीसंख्या उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) विविध राज्य सार्वजनिक विद्यापीठांतर्गत शासन निर्णयान्वये विहित केलेल्या निकषांची पूर्तता न करणाऱ्या मागील तीन वर्षातील महाविद्यालयांचा महसूल विभागनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहेः

| **अ. क्र.** | **महसुली विभाग** | **तपासणी दरम्यान विद्यापीठांची संलग्नता प्राप्त असूनही आवश्यक भौतिक सुविधा पात्र अध्यापक वर्ग, प्रयोगशाळा/ ग्रंथालय व्यावस्था व किमान विद्याार्थीसंख्या उपलब्ध नसलेली महाविद्यालयांची संख्या.** | | |
|---|---|---|---|---|
| | | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
| १ | कोकण विभाग | ० | ० | २ |
| २ | अमरावती विभाग | २ | १ | २० |
| ३ | पुणे विभाग | १९ | २ | ३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | नागपूर विभाग | २७ | २ | १२ |
| ५ | नाशिक विभाग | ० | ४ | ५ |
| ६ | छत्रपती संभाजीनगर | ० | १ | ८१ |
| | **एकूण** | **४८** | **१०** | **१२३** |

(३) व (४) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०८ अन्वये संलग्नीकरण आणि मान्यता यांकरीता शर्ती विहित करण्यात आलेल्या आहेत. तसेच, कलम ११७ अन्वये महाविद्यालयाचे व मान्यताप्राप्त परिसंस्था यांची तपासणी व अहवालाबाबत आणि कलम १२० अन्वये संलग्नीकरण आणि मान्यता काढून घेणे याबाबत तरतूद विहित करण्यात आलेली आहे. जी महाविद्यालये शासन निकषांची पूर्तता करीत नाहीत त्या महाविद्यालयांसदर्भात विद्यापीठ स्तरावर अधिनियमातील सदर तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येते.

अधिनियमातील उपरोक्त तरतुदीनुसार, विद्यापीठांशी संलग्नित ज्या महाविद्यालयांमध्ये आवश्यक भौतिक सुविधा, पात्र अध्यापकवर्ग, प्रयोगशाळा/ग्रंथालय व्यवस्था व किमान विद्यार्थीसंख्या उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, अशा महाविद्यालयांसदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२० नुसार संबंधित विद्यापीठ स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नीट परीक्षा पेपर फुटी प्रकरणात खाजगी शिकवणी वर्गाचा सहभाग असल्याबाबत

**(८) * १०५४० श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील राजस्थान, दिल्ली आणि बिहार सारख्या राज्यांनी खाजगी शिकवणी वर्गावर नियंत्रण आणण्यासाठी स्वतंत्र कायदे अथवा नियामक तरतुदी लागू केल्या असतानादेखील महाराष्ट्र राज्यात खाजगी शिकवणी वर्गावर नियंत्रण आणण्यासाठी अशा स्वरुपाचा स्वतंत्र कायदा अस्तित्वात नसल्याने नीट (NEET UG) परीक्षा पेपर फुटी प्रकरण उघडकीस आल्यावर खाजगी शिकवणी वर्गावरील नियंत्रणाचा मुद्दा पुन्हा उपस्थित झाला असल्याचे माहे मे,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात लातूर आणि पुण्यातील काही नामांकित खाजगी शिकवणी वर्गचालक व प्राध्यापक या रॅकेटमध्ये मुख्य सूत्रधार म्हणून काम करत असल्याचे सीबीआय तपासात निष्पन्न झाले असून, लातूर येथील आरसीसी (RCC) खाजगी शिकवणी वर्गाचे संचालक यांनी परीक्षा होण्याआधीच १० दिवस अगोदर पेपर मिळवून तो विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहारामुळे देशभरातील विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्याने पालकांनी खाजगी शिकवणी वर्गांवर नियंत्रण आणण्यासाठी स्वतंत्र "महाराष्ट्र खाजगी शिकवणी कायदा" तातडीने लागू करण्याची शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने लातूर येथील आरसीसी (RCC) खाजगी शिकवणी वर्गाच्या संबंधित दोषी संचालकाविरुध्द कोणती कारवाई केली तसेच विद्यार्थ्यांच्या हितसंरक्षणाकरीता कोणती उपाययोजना केली तसेच शैक्षणिक गुणवत्तेबाबत नियमन करण्यासाठी स्वतंत्र "महाराष्ट्र खाजगी शिकवणी नियमन कायदा" करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय.
(२) सदर प्रकरणाचा तपास सीबीआय या यंत्रणेमार्फत करण्यात येत आहे.
(३) ०३ पालकांनी विभागस्तरावर असे निवेदन दिले आहे.
(४) व (५) सदर प्रकरणाचा तपास सीबीआय या यंत्रणेमार्फत करण्यात येत आहे.

श्री.सुखदेब सहा यांनी मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे आंध्रप्रदेश सरकार विरोधात दाखल केलेली याचिका प्रकरणी दिनांक २५/०७/२०२५ आदेशान्वये मा.न्यायालयाने निर्गमित केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने विभागाच्या दिनांक ०७/०१/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील शाळांमध्ये तसेच खाजगी शिकवणी वर्गामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ताण तणाव निर्माण होऊ नये यांकरीता प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्याकरीता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय निरीक्षण समिती स्थापन करण्यात आल्या आहेत तसेच खाजगी शिकवणी वर्गाकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

केंद्र शासनाने दिनांक १६/०१/२०२४ रोजी निर्गमित केलेल्या मागदर्शक सूचना व तसेच देशातील अन्य राज्यांनी खाजगी शिकवणी वर्गांकरीता तयार केलेले अधिनियम/नियम यातील तरतुदी विचारात घेवून राज्यातील खाजगी शिकवणी वर्गाकरीता सर्व समावेश "खाजगी शिकवणी (विनियमन) अधिनियम, २०२६" तयार करण्याची कार्यवाही विभागस्तरावर करण्यात येत आहे.

-----------------

## वऱ्हा, धोत्रा, माळेगाव, सालोरा व शेंदोळा बु. (ता.तिवसा, जि.अमरावती) गावांतील शेतकऱ्यांना कायमस्वरूपी सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(९) * १०६०५ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा वऱ्हा, धोत्रा, माळेगाव, सालोरा व शेंदोळा बु. (ता.तिवसा, जि.अमरावती) या गावांतील शेतकऱ्यांना कायमस्वरूपी सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी गुरुकुंज उपसा सिंचन योजना अथवा अन्य पर्यायी सिंचन योजना राबविण्याबाबत स्थानिक शेतकरी, लोकप्रतिनिधी व ग्रामपंचायतींमार्फत शासनाकडे प्रस्ताव व निवेदने सादर करण्यात आली असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावांचा समावेश वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात करण्यात आला आहे त्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर प्रकल्पाची सद्य:स्थिती काय आहे तसेच संबंधित गावांना या प्रकल्पातून प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ मिळण्यास किती कालावधी अपेक्षित आहे,

(३) असल्यास, वैनगंगा–नळगंगा प्रकल्प पूर्ण होण्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता विचारात घेता मौजा वऱ्हा, धोत्रा, माळेगाव, सालोरा व शेंदोळा बु. येथील शेतकऱ्यांना तात्पुरत्या स्वरूपात किंवा अल्पकालीन उपाययोजनेद्वारे सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी गुरुकुंज उपसा सिंचन योजना, स्वतंत्र उपसा सिंचन योजना व अन्य पर्यायी जलस्रोत विकसित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर गावांचा समावेश वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पांतर्गत नव्याने प्रस्तावित मार्डी धरणाच्या लाभक्षेत्रात करण्यात आला आहे. सदर धरणाची साठवण क्षमता १०.८९ द.ल.घ.मी. एवढी असून या धरणाच्या लाभक्षेत्रामध्ये तिवसा तालुक्यातील अलीपुर, दहिगांव, धोत्रा, गव्हा, बाळापुर, जावरा, कोलवण, मालधुर, माळेगांव, सालोरा (बु.), शेंदोळा (बु.), शिरजगांव, शिवणगांव, विष्णोरा, व-हा व अमरावती तालुक्यातील पिंपळविहिर या गावांमधील एकूण २६२६ हे. लाभभेत्राचा समावेश आहे.

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पास शासन निर्णय दिनांक ०९/०३/२०२६ अन्वये प्राप्त प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये सदर धरण व लाभक्षेत्र अंतर्भूत आहे. सद्य:स्थितीत प्रकल्पाचे घटकांचे संकल्पन तयार करण्याचे व त्याकरीता आवश्यक भूसंपादन प्रस्ताव तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच प्रकल्पास आवश्यक वैधानिक मान्यता घेण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पांतर्गत नव्याने प्रस्तावित मार्डी धरणाच्या लाभक्षेत्रातील मौजे व-हा, धोत्रा, माळेगांव, सालोरा (बु.), शेंदोळा (बु.), इ. १२ गावांना वैनगंगा-नळगंगा प्रकल्पाऐवजी उर्ध्व वर्धा प्रकल्पात बचत होत असलेल्या ९.३९ द.ल.घ.मी.पाणी बचतीमधून उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या उजव्या कालव्यावरुन गुरुकुंज उपसा सिंचन योजना भाग -२ अंतर्गत सिंचन सुविधा उपलब्ध करून दिल्यास उपरोक्त योजना लवकर पूर्ण करून लाभ देता येणे शक्य आहे, असे क्षेत्रिय कार्यालयाचे अभिप्राय आहेत. त्यानुसार क्षेत्रिय स्तरावर तपासणी व अभ्यास सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील जिगाव सिंचन प्रकल्पासाठी खरेदी केलेल्या पाईप व इतर साहित्याच्या साठ्याला आग लागून कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याबाबत

**(१०) * १०१६९ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील जिगाव सिंचन प्रकल्पासाठी खरेदी करण्यात आलेल्या माटरगाव-जलंब परिसरातील पाईप व इतर साहित्याच्या साठ्याला भीषण आग लागून कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे माहे एप्रिल,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिगाव सिंचन प्रकल्पासाठी खरेदी करण्यात आलेल्या पाईप व इतर साहित्याच्या साठ्याला आग लागण्याची कारणे अद्याप पर्यंत जाहीर करण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आगीत जलसंपदा विभागाने खरेदी केलेल्या पाईप व इतर सिंचन साहित्याचे कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले आहे, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणात निष्काळजीपणा व अन्य कारणांमुळे दोषी आढळलेल्या संबंधित अधिकारी / कर्मचारी व कंत्राटदार यांच्यावर कोणती कारवाई केली तसेच जिगाव प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत पूर्ण होण्यासाठी आगीत नष्ट झालेल्या पाईप व साहित्याची तात्काळ पुनर्खरेदी अथवा पर्यायी उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

जिगांव प्रकल्पाच्या बंदीस्त नलिका वितरण प्रणालीचे काम मे. मेघा इंजिनीयरिंग व इंफ्रास्ट्रक्चर्स लिमिटेड, हैदराबाद या अभिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे. सदर कामाअंतर्गत २८,४१२ हे. क्षेत्रावर सिंचन क्षमता निर्मिती करण्याचे नियोजित आहे. सदर कामांतर्गत HDPE नलिकांकरीता मौजे जलंब येथील अभिकरणाच्या Stock Yard ला दिनांक २६/०४/२०२६ रोजी रात्री ९.३० ते ९.४५ दरम्यान आग लागल्याची घटना घडली आहे. याबाबतची माहिती मिळताच नजिकच्या नगर परिषद, शेगाव, जळगाव जामोद, खामगाव व नांदुरा यांचेकडील अग्निशमन यंत्रणा घटनास्थळी उपलब्ध करुन आग विझविण्याकरीता शर्तीचे प्रयत्न करण्यात आले परंतु आगीचे स्वरुप विस्तीर्ण असल्यामुळे साठवणूक केंद्रामध्ये असलेले पाईप व इतर साहित्य आगीच्या भक्षस्थानी आल्यामुळे जळाले आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

जिगाव सिंचन प्रकल्पासाठी खरेदी करण्यात आलेल्या पाईप व इतर साहित्याच्या साठ्याला दिनांक २६/०४/२०२६ रोजी उच्चदाब वाहिनीमुळे शॉर्ट सर्किट झाल्याने अपघाती आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. सदर आगीच्या घटनेबाबत जलंब पोलीस स्टेशन येथे अभिकरणाच्या प्राधिकृत प्रतिनिधींनी दिनांक २७/०४/२०२६ रोजी लेखी फिर्याद दाखल केलेली असून घटनेबाबत तहसिलदार, शेगाव आणि संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांनी दिनांक २७/०४/२०२६ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार आग हि विजवाहिन्या, लोखंडी पोल तार तसेच डिपी जळाल्यामुळे लागल्याचे कळविलेले आहे. सद्य:स्थितीत पोलीस यंत्रणेमार्फत चौकशी सुरु आहे.
(३) हे खरे नाही.

सदर आगीमध्ये HDPE पाईपचे वेगवेगळया व्यासाचे एकूण अंदाजे ३८५ किमी लांबीचे पाईप जळालेले असून यामुळे ३७ कोटींचे नुकसान झालेले आहे. उपरोक्त नमूद आगीच्या घटनेमध्ये हानी झालेल्या पाईप व इतर सिंचन साहित्य हे संबंधित अभिकरणाकडून विकत घेण्यात आलेले असून हे संपूर्ण साहित्य त्यांचे ताब्यात असताना जळून उद्ध्वस्त झालेले असल्याकारणाने जलसंपदा विभागाचे या घटनेमध्ये कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही. सदर स्टॉकयार्ड व त्यावरील सर्व साहित्याचा अभिकरणामार्फत विमा काढण्यात आलेला आहे. तसेच, निविदा करारनाम्यामधील कलम-२३ मध्ये नमुद केल्यानुसार “Liability of contractor in any damage done in or outside work area” सर्व नुकसानीची जबाबदारी ही सर्वस्वी संबंधित कंत्राटदार अभिकरणाची असल्याचे नमूद करण्यात आले आहे व ही जबाबदारी सर्वस्वी स्विकारत असल्याबाबत संबंधित कंत्राटदार अभिकरणाने दिनांक ०८/०६/२०२६ रोजी हमीपत्र सादर केलेले आहे. संबंधित कंत्राटदार जर साहित्याचा पुरवठा व उभारणी करण्यास अक्षम ठरल्यास सदर रकमेची वसुली करण्यात येईल.

(४) जिगांव प्रकल्पाच्या नलिका वितरण प्रणालीच्या कामांतर्गत नलिकांचा पुरवठा, उभारणी, तपासणी व देखभाल दुरुस्ती करणे इ.बाबींचा समावेश आहे. त्यामुळे अभिकरणामार्फत सदर साठवणूक केंद्रामध्ये ठेवण्यात आलेल्या साहित्याची संपूर्ण जबाबदारी ही अभिकरणाची आहे. सदर आग लागल्याप्रकरणी महसूल व पोलीस प्रशासनामार्फत स्थळपंचनामा करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी पोलीस यंत्रणेमार्फत चौकशी प्रगतीत आहे. सदर चौकशीच्या निष्कर्षाअंति दोषींवर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल. प्रकल्पिय नियोजनानुसार काम नियोजित वेळेत पूर्ण होण्यासाठी अभिकरणामार्फत सादर हमीपत्रानुसार आगीत नष्ट झालेल्या पाइप व साहित्याचा पुरवठा पूर्ववत करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यातील भंडारदरा धरणाच्या कालव्यांवर पाणी मोजमाप यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत

**(११) * ९९३० श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर जिल्ह्यातील रहाता तालुक्यात भंडारदरा धरणाच्या पाणीवाटपात अनियमितता झाल्याची व पाणी मोजमापासाठी वापरण्यात येणारी यंत्रणा नादुरुस्त असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारदरा धरणावर कालव्यांच्या माध्यमातून जवळपास ५७ हजार हेक्टर जमीन ओलिताखाली येत असूनही ‘एसडब्ल्यूएफ’ (Standing Wave Flume) ही पाणी मोजमाप यंत्रे गेल्या कित्येक वर्षांपासून बंद असल्याने पाणीपुरवठा व वितरणाची नोंद अचूकपणे ठेवता येत नाही व त्यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणी मोजमाप यंत्रणा नादुरुस्त असल्याचा फायदा घेऊन बेकायदेशीररित्या पाणी उपसा होत असल्याने अधिकृत पाणीपरवानाधारक संस्था, कारखाने आणि लाभधारक शेतकऱ्यांना पूर्ण क्षमतेने पाणी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने पुढील एका महिन्यात ‘एसडब्ल्यूएफ’ यंत्रणा पूर्णपणे कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच भविष्यात पाणीचोरी रोखण्यासाठी व पाणी मोजमाप केंद्रांवरील उपकरणे दुरुस्ती करुन अनधिकृत पाणी उपसा रोखण्यासाठी व पाणीवाटप व्यवस्थापन अधिक पारदर्शक करण्यासाठी कोणती उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

भंडारदरा धरणावरील प्रवरा कालवे ओझर पासून सुरु होतात. त्यात प्रवरा डाव्या कालव्यावर पाणी मोजमापासाठी एसडब्ल्युएफ’ (Standing Wave Flume) पहिल्या किमी मध्ये ओझर, तालुका-संगमनेर, जिल्हा- अहिल्यानगर येथे; २६ किमी मध्ये बाभळेश्वर, तालुका-रहाता, जिल्हा- अहिल्यानगर,

४९ किमी मध्ये बेलापूर रोड तालुका-श्रीरामपूर, जिल्हा-अहिल्यानगर, ६६ किमी मध्ये खिर्डी, तालुका-नेवासा येथे आहेत. तसेच, बाकीच्या सर्व कालवा वितरण व्यवस्थेवर सुध्दा मोजमाप यंत्रणा आहेत. आवर्तन कालावधी मध्ये नियमित मोजून दिले जाते व नोंदी gauge रेजिस्टर मध्ये नियमित घेतल्या जातात.

तसेच मुख्य कालवा, सर्व वितरीका, लुघ वितरीका यांवर पाणी मोजून देण्यात येत असल्यामुळे पाण्याचा अपव्यय होतो हे म्हणणे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

प्रवरा कालव्यांवर पाणी मोजुनच वापरले जाते तसेच त्याचा लेखा ठेवण्यात येत असल्याने बेकायदा पाणी उपसा होतो असे म्हणणे खरे नाही. तसेच प्रत्येक सर्व लाभधारकांना पूर्ण क्षमतेने पाणी देण्यात येत आहे. तसेच दरवर्षी जललेखा अहवाल व सिंचन स्थितीदर्शक अहवाल शासनास सादर करण्यात येतो.

(४) MIIP अंतर्गत खंडाळा येथे नव्याने SWF बांधण्याचे प्रस्तावित केलेले आहे तसेच बाकीच्या वितरण व्यवस्थावरील मोजमाप यंत्रणांचे दुरुस्ती प्रस्तावित केलेले असून सदर कामाची निविदा काढण्यात आली असून कार्यारंभ आदेश देण्याचे काम प्रगतीप्रथावर आहे. या व्यतिरिक्त आवश्यकतेनुसार अनधिकृत उपसा रोखण्यासाठी वीज बंदी करण्यात येते तसेच भरारी पथके स्थापन करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील केंद्रीय मंडळांच्या शाळांमध्ये मराठी विषयाच्या अध्यापनाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(१२) * ९८१८ श्री.किशोर दराडे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व मंडळांच्या शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा असताना अनेक केंद्रीय मंडळांच्या (उदा. सीबीएसई) शाळांमध्ये मराठी विषयाच्या अध्यापनाची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी ही मातृभाषा असणाऱ्या ८०,८०३ विद्यार्थ्यांनी प्रथम भाषा म्हणून मराठीची निवड करूनही महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या सन २०२६ च्या दहावीच्या निकालात मराठी विषयात अनुत्तीर्ण झाल्याने मराठी विषयाचा निकाल मागील पाच वर्षांतील नीचांकी म्हणजे ९२.५७ टक्के इतका नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झालेला असताना व शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा करण्यात आलेला असतानाही राजभाषेच्या निकालातील ही घसरण शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी दर्शविणारी असून नवीन कृतीपत्रिका आराखडा, शुध्दलेखनातील त्रुटी, वाचन संस्कृतीचा अभाव, मराठी विषयासाठी पात्र शिक्षकांची कमतरता आणि विद्यार्थ्यांचा इतर भाषांकडे वाढता कल यामुळे मराठी विषयाच्या गुणवत्तेवर प्रतिकूल परिणाम होऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मराठी विषय शिकविण्यासाठी संबंधित शाळांमध्ये मराठी विषयातील आवश्यक शैक्षणिक अर्हता प्राप्त शिक्षकांची नियुक्ती बंधनकारक करण्याबाबत शिक्षण विभागाने सुधारित आदेश जारी केले असून मराठी विषयाच्या अंमलबजावणीबाबत राज्यात पडताळणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व चौकशीच्या अनुषंगाने शिक्षणतज्ज्ञ, भाषातज्ज्ञ व अनुभवी शिक्षकांशी चर्चा करून मराठी विषयाच्या गुणवत्तावृद्धीसाठी व निकालात सुधारणा घडवून आणण्यासाठी कालबध्द कृती आराखडा तयार करण्याबाबत तसेच मराठी विषयाच्या अध्यापन पध्दतीत आवश्यक सुधारणा करून विद्यार्थ्यांमध्ये मराठी विषयाची आवड निर्माण करण्यासाठी, वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली तसेच मराठी विषयाच्या अंमलबजावणीबाबत जारी करण्यात आलेल्या आदेशांचे पालन न करणाऱ्या शाळांवर आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) राज्यातील सर्व माध्यमाच्या सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याबाबतच्या अधिनियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबतची दक्षता सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा २०२६ मध्ये मराठी प्रथम भाषासाठी १०,८७,८९९ विद्यार्थी परीक्षेस बसले होते त्यापैकी ८०,८०३ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले. तसेच मराठी हा विषय द्वितीय व तृतीय भाषा घेऊन ४,१३,९१७ विद्यार्थी परीक्षेस बसले होते त्यापैकी १३,७४१ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले.

(३) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेबाबत रुची निर्माण करण्याकरीता व अध्ययनास पूरक ठरावे याकरीता विविध प्रयत्न करण्यात येतात. राज्यात सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये मराठी विषय समूह स्थापन करून याद्वारे विविध उपक्रम घेण्याकरीता क्षेत्रिय यंत्रणेस मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने विविध उपक्रम घेण्याबाबत सूचित करण्यात येते.

विद्यार्थ्यांमधील वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी इयत्ता पहिली ते दहावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वाचन साहित्य म्हणून ग्रंथालयाकरीता पूरक वाचन साहित्य उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांचा वाचनाच्या स्तरानुसार वाचन कौशल्यांचा विकास व्हावा याकरीता सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांना वाचन स्तरावर आधारित स्तराधारित वाचन साहित्य उपलब्ध करून देण्यात आलेले आहे त्यामुळे मुलांच्या वाचन स्तरानुसार त्यांची वाचन संस्कृती विकसित होणे अपेक्षित आहे. तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीचा विकास व्हावा या हेतूने महावाचन चळवळ राबविण्यात आली आहे.

(४) शासन निर्णय दिनांक २५ फेब्रुवारी, २०१९ अन्वये भाषा विषय अध्यापनासाठी शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक आर्हता निश्चित केली असून याद्वारे भाषा विषय अध्यापनासाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची

संबंधित विषयातील पदवी परीक्षा किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षास संबंधित विषयासह किमान ५०% गुणांसह उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची दोन वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा असे निकष निश्चित केले आहेत.

(५) विद्यार्थ्यांच्या भाषिक गुणवत्तेत सुधारणा करणेसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या संकेत स्थळावर पूरक अध्ययन साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षेस योग्य तऱ्हेने सामोरे जावे याकरीता इयत्ता नववी ते दहावीतील विद्यार्थ्यांकरीता विशेष मार्गदर्शन करण्याकरीता पुरवणी परीक्षा तयारी पुस्तिका व प्रश्नपेढी तयार करण्यात आली आहे व परिषदेच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. याचा लाभ विद्यार्थी घेत आहेत.

शिक्षकांचे सक्षमीकरण व्हावे याकरीता नवीन शैक्षणिक धोरणानुसार सन २०२५ (मे-जून) या कालावधीत इयत्ता पहिलीला शिकविणाऱ्या ८०९२५ शिक्षकांना बदलेल्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत सन २०२६ (मे-जून) या कालावधीत इयत्ता २ री, ३री, ४ थी व ६ वी च्या शिक्षकांना अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देणे नियोजित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दिशाभूल करणारी नावे वापरणाऱ्या शाळांवर कारवाई करण्याबाबत

**(१३) * ९७८४ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिनांक २ एप्रिल, २०२६ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार नवीन शाळा सुरू करताना किंवा शाळांच्या नावांमध्ये ‘इंटरनॅशनल’, ‘ग्लोबल’, ‘युनिव्हर्सल’ यांसारख्या शब्दांचा वापर करून पालक व विद्यार्थ्यांची दिशाभूल करणाऱ्या संस्थांवर निर्बंध घालणारी सुधारित नियमावली जारी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियमावलीनुसार ज्या शैक्षणिक मंडळाशी (उदा. राज्य मंडळ, सीबीएसई, आयसीएसई) शाळा संलग्न आहे, त्या मंडळाचा उल्लेख शाळेच्या नावात करणे अनिवार्य करण्यात आले असून, केवळ मान्यताप्राप्त आंतरराष्ट्रीय मंडळांशी प्रत्यक्ष संलग्न असलेल्या शाळांनाच ‘इंटरनॅशनल’ यांसारखे विशिष्ट शब्द वापरण्याची परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ‘सैनिक शाळा’ आणि ‘कॉन्व्हेंट’ या शब्दांच्या वापराबाबत कडक निकष निश्चित करण्यात आले असून, संबंधित निकषांची पूर्तता न करणाऱ्या शाळांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खाजगी व स्वयंअर्थसहाय्यित शाळांकडून दिनांक २ एप्रिल, २०२६ रोजी शासनाने घेतलेल्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी न करणाऱ्या तसेच नियमांचे उल्लंघन करून दिशाभूल करणारी नावे वापरणाऱ्या शाळांना नावे बदलण्यासाठी निश्चित केलेल्या कालमर्यादेनंतरही पालन न करणाऱ्या संस्थांविरुध्द कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) शाळा ज्या शैक्षणिक मंडळाशी संलग्न आहे त्या मंडळाचा उल्लेख शाळेच्या नावात करणे अनिवार्य नसून संबंधित शैक्षणिक मंडळाचा उल्लेख करणेची बाब ऐच्छिक स्वरूपाची आहे.

तसेच, शाळेच्या नावातील दिशाभूल करणारे शब्दास प्रतिबंध करणेच्या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय शैक्षणिक मंडळाशी संलग्न होण्यास इच्छूक असलेल्या शाळांनी, शाळेच्या नावात "इंटरनॅशनल", "ग्लोबल", "युनिव्हर्सल" यासारखे शब्द वापरणेस मुभा दिली आहे.

तसेच, सैनिकी शाळा म्हणून मान्यताप्राप्त शाळांना "सैनिकी" शब्दाचा वापर करणे व ख्रिस्ती धर्मसंघाद्वारे/ ख्रिश्चन नन्स (भिक्षुणी) समुदायाद्वारे स्थापित करण्यात येणाऱ्या शाळांनाच "कॉन्व्हेंट" शब्दाचा वापर करणेची मुभा आहे.

(४) सदर शासन निर्णय हा भूतलक्षी प्रभावाने लागू करण्यात आलेला नसून यापुढे स्थापित करण्यात येणाऱ्या शाळांनी, दिशाभूल करणारे शब्द शाळेच्या नावात वापरू नयेत, याकरीता सर्वसाधारण सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोपरगाव व संगमनेर तालुक्यातील (जि.अहिल्यानगर) निळवंडे प्रकल्पाच्या कालवा वितरण व्यवस्थेची कामे पूर्ण करण्याबाबत

**(१४) * ९९३३ श्री.सत्यजीत तांबे, श्री.विवेक कोल्हे :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव व संगमनेर तालुक्यात निळवंडे प्रकल्पाच्या कालवा वितरण व्यवस्थेची कामे अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने, भंडारदरा व निळवंडे धरणांमधून हक्काचे पाणी मिळावे, रोटेशन कालावधीत दिवसा किमान ११ तास पूर्ण दाबाने वीजपुरवठा करावा तसेच प्रलंबित पीकविमा दावे मंजूर करावेत या मागण्यांसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, शेतकरी संघटना, सामाजिक कार्यकर्ते व शेतकरी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास निवेदन दिल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निळवंडे प्रकल्पाच्या कालवा वितरण व्यवस्थेची कामे संथ गतीने सुरू असण्यामागील कारणे काय आहेत, सदर कामांची तालुकानिहाय व टप्पानिहाय सद्य:स्थिती काय आहे, तसेच संगमनेर तालुक्यास सन १९८९ पासून भंडारदरा धरणातून मंजूर असलेल्या ३० टक्के हक्काच्या पाणी वाटपाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे तसेच रोटेशन कालावधीत दिवसा ११ तास वीजपुरवठा करण्याबाबत निर्गमित आदेशांचे गेल्या दोन वर्षांत पालन झाले नसल्याने अनेक उपसा जलसिंचन योजना बंद पडून शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत कोपरगाव व संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांनी पीकविमा भरूनही पीक नुकसानीच्या तुलनेत अत्यल्प नुकसानभरपाई मिळाल्याने प्रशासनाच्या व विमा कंपनीच्या चुकीच्या सॅटेलाइट आधारित मूल्यांकन, तांत्रिक निकष अथवा प्रशासकीय त्रुटींमुळे अनेक पात्र शेतकरी नुकसानभरपाईपासून वंचित राहिले आहेत तसेच निळवंडे धरणाचे काम पूर्ण होऊनही कालवा सल्लागार समितीच्या बैठका न घेता पाण्याचे वितरण करण्यात येत असल्याने हक्काचे पाणी

बेकायदेशीरपणे खालच्या भागात वळविले जात असून शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक व प्रशासकीय नियमांची पायमल्ली होत असून प्रशासनाच्या या बेजबाबदार कामकाजामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने कोपरगाव व संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना भंडारदरा व निळवंडे धरणातून नियमानुसार हक्काचे पाणी उपलब्ध करून देणे, निळवंडे कालवा वितरण व्यवस्थेची प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करणे, रोटेशन कालावधीत दिवसा ११ तास अखंड व पूर्ण दाबाने वीजपुरवठा सुनिश्चित करणे, पीकविमा दाव्यांचे पुनर्मूल्यांकन करून पात्र शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई अदा करणे आणि कालवा सल्लागार समितीच्या नियमित बैठका घेण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) संगमनेर आणि कोपरगाव तालुक्यातील अनुक्रमे ५३१.०१ किमी व १३६.४० किमी पैकी २१८.१७ किमी व ७५.०० किमी वितरण प्रणालीची कामे पूर्ण झालेली आहेत.

निळवंडे प्रकल्पांतर्गत २०६२३ हे. बंद नलिका वितरण प्रणालीची (PDN) कामे करण्यात आलेली आहे. तसेच निळवंडे प्रकल्पाच्या वितरण व्यवस्थेची कामे जून-२०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून कामे प्रगतीपथावर आहे. संगमनेर व कोपरगाव तालक्यात निळवंडे प्रकल्पांतर्गत कोणतीही उपसा सिंचन योजना कार्यान्वित नाही.

शासन पत्र दिनांक ०४/०८/१९८९ नुसार भंडारदरा धरणामुळे सध्या उपलब्ध होणाऱ्या एकूण उपयुक्त पाणी साठ्याचे तालुकानिहाय पाणी वाटप करण्यात येते. कालव्यावरील क्षेत्राच्या सिंचनासाठीच्या आवर्तन कालावधीत भंडारदरा ते ओझर या भागातील विद्युत पंपांचा विद्युत पुरवठा जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने बंद ठेवण्यात येतो.

(३) अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव व संगमनेर तालुक्यात खरीप हंगाम २०२५ मध्ये दिनांक २५/०६/२०२६ अखेर रक्कम रुपये ९६६.३३ लाख नुकसान भरपाई मंजूर झाली आहे. त्यापैकी रक्कम रुपये ९५५.६९ लाख वाटप करण्यात आली असून, उर्वरित रक्कम रुपये १०.६४ लाख कृषी विभागाकडून अदा करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

बंद नलिका वितरण प्रणालीचे काम अद्याप पूर्ण झालेले नसल्यामुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना मागणी नुसार सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने नाले व ओढ्यांमध्ये पाणी सोडण्यात येते. या माध्यमातून संगमनेर व कोपरगाव तालुक्यातील प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील तळे / तलाव / बंधारे भरून देण्यात येतात. त्यामुळे भूजल पातळीत वाढ होण्यास मदत होत असून परिसरातील विहिरी व बोअरवेलचे पुनर्भरण होऊन शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होते.

भंडारदरा धरण व निळवंडे धरणाच्या पाणीसाठ्याचे नियोजनाकरीता नियमित कालवा सल्लागार बैठकांचे आयोजन करण्यात येत असून बैठकीतील निर्देशांप्रमाणे पाणी आवर्तनाचे नियोजन करण्यात येते.

(४) प्रवरा नदी काठावरील कृषीपंपांना लगतच्या ३३/११ के.व्ही. उपकेंद्रामधून निघणाऱ्या कृषी वाहिन्यांमधून वीज पुरवठा करण्यात येत आहे. सदर कृषी वाहिन्यांवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी दिनांक ०९/०५/२०११ रोजी याचिका क्र. ८०/२०१० मध्ये दिलेल्या निर्देशानुसार ८ तास दिवसा

किंवा ८ तास रात्री थ्री फेज वीज पुरवठा चक्राकार पध्दतीने करण्यात येत आहे. तसेच, जे उच्चदाब उपसा जलसिंचन प्रकल्प Express वाहिन्यांद्वारे जोडले गेले आहे अशा सिंचन प्रकल्पांना आठवड्यातून ६ दिवस १६ तास व एक दिवस पूर्णतः बंद असा वीज पुरवठा करण्यात येत आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार खरीप २०२५ हंगामातील पिकांकरीता राष्ट्रीय पीक विमा पोर्टलवर नुकसान भरपाई परिगणना केली जाते. तसेच सोयाबीन, कापूस व भात पिकांसाठी पीक कापणी प्रयोगांवर आधारित उत्पादनास ५०% भारांकन व तांत्रिक उत्पादनास ५०% भारांकन आहे. त्याकरीता NRSC, हैद्राबाद व MRSAC, नागपूर या सरकारी संस्थामार्फत तंत्रज्ञानावर आधारित (Satellite Based) तंत्रज्ञानांचा वापर करून तांत्रिक उत्पादन निश्चित केले जाते. त्यानुसार राष्ट्रीय पीक विमा पोर्टलवर पीक नुकसान भरपाई स्वयंचलितरित्या निश्चित केली जाते. यात विमा कंपनींचा कोणताही हस्तक्षेप नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.